# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांकः १९६७, मुंबई :४०० ००१.
**दूरध्वनी- २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स नं.२२६९२१०२**
E_mail desk15@dte.org.in internet :- http://www.dte.org.in

**अत्यंत महत्वाचे**

क्रमांक :- १५/अर्थसं/ईबीसी/२००८-०९/ ३५३
दिनांक :- 21 जनवरी 2010

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/
अमरावती/नागपूर.

विषय :- **शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थेतील सन २००७-०८ मध्ये प्रवेश घेतलेल्या आर्थिक दृष्टया मागासलेल्या विद्यार्थ्यांना (EBC) व माजी सैनिकांचे (Ex Serviceman) पाल्यांना शिक्षण शुल्क सवलत मंजूर करणेबाबत**

संदर्भ :- या संचालनालयाचे पत्र क्र. १५/अर्थसं/ईबीसी/२००८/२१४, दि. २.६.२००८

महोदय,

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थांमधे राबविण्यात येणा-या पदवी व पदविका अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांना, माजी सैनिकांच्या पाल्यांना शिक्षण शुल्क सवलत मंजूर करण्याबाबतची योजना संचालक, तंत्रशिक्षण यांच्यामार्फत राबविण्याबाबत अधिकार प्रदान करुन त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालये यांना अधिकार प्रदान करण्यासंदर्भात शासन स्तरावरुन निर्णय घेण्याबाबतचा प्रस्ताव शासनास संदर्भिय पत्रान्वये सादर करण्यात आलेला आहे. तसेच याबाबत संचालनालयाकडून शासनाकडे वारंवार पत्रव्यवहार देखील सुरु आहे. तसेच संचालनालयातील संबंधित अधिका-यांमार्फत शासन स्तरावरील संबंधिताकडे प्रत्यक्ष भेटी देऊन चर्चाही करण्यात आलेली आहे. त्यावेळी त्यांच्याकडून असे समजले की, संबंधित प्रकरण मा.मंत्रीमंडळाकडे चर्चेला/निर्णयाला ठेवण्यात आलेले आहे. तरी त्याबाबत शासनाकडून अद्यापपावेतो कोणताही निर्णय कळविण्यात आलेला नाही. सदरहू वस्तुस्थिती विचारात घेऊन सदरहू प्रकरणी आपण आपल्या अधिपत्याखालील सर्व संबंधित शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थांना त्वरित वस्तुस्थिती अवगत करावी.

आपला,

(डॉ. सु. का. महाजन)
प्र. संचालक,
तंत्रशिक्षण, म.रा., मुंबई

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

जा.क्र. तंशिविकापु/ईबीसी/२००९/११६९

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.
दिनांक :- ३१/०१/२००९
31 JAN 2009

प्रत,

प्राचार्य,
सर्व शासकीय शासकीय अनुदानित तंत्रनिकेतने, /अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये/हॉटेल मॅनेजमेंट केटरींग टेक्नॉलॉजी/व तत्सम पदविका संस्था यांना माहिती साठी.

(गो. पं. चौधरी)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे